**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**बुधवार दिनांक १३ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.**
2. **2026-27 साठी 14 खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ; तूर आठ हजार चारशे पन्नास रुपये तर कापसाला 8267 रुपये प्रति क्विंटल दर मंजूर.**
3. **सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात आजपासून वाढ.**
4. **अकोला, अमरावती आणि वर्धा इथं उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी; रात्रीच्या तापमानात देखील वाढ होण्याची शक्यता.**

---------------------------------------

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

केंद्रीय मंत्रिमंडळाने आज, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या मिहान इंडिया लिमिटेडला भाडेपट्ट्यावर दिलेल्या जमिनीचा कालावधी 06.08.2039 नंतरही वाढवण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे सवलतदार जीएनआयएएल अर्थात जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडला व्यावसायिक संचालन सुरू झाल्याच्या तारखेपासून 30 वर्षांकरिता विमानतळाचा परवाना देणे शक्य होईल. यामुळे नागपूर विमानतळाच्या विकास आणि पायाभूत सुविधांच्या उन्नतीच्या एका नवीन पर्वाची सुरुवात होईल असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं-

***(होल्ड बाईट - माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव २२ सेकंद)***

याअंतर्गत जीएनआयएएल हे नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे जागतिक दर्जाच्या सुविधेत रूपांतर करणार आहे. भविष्यात या विमानतळावर वार्षिक 3 कोटी प्रवाशांची हाताळणी करण्याची क्षमता विकसित करण्याचे नियोजन असून, त्यामुळे प्रवासी तसेच कार्गो सेवा अधिक सक्षम आणि बळकट होणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

यांनी या निर्णयाबद्दल केंद्राचे आभार मानले असून या निर्णयामुळे ब्राऊनफिल्ड विमानतळ विकासाचा मार्ग मोकळा  झाल्याची भावना व्यक्त केली.

---------------------------------------

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय/ MSP

2026-27 साठी 14 खरीप पिकांच्या MSP अर्थात किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्यास आज आर्थिक व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला लाभदायक दर मिळावा, या उद्देशाने केंद्र सरकारने 2026-27 या विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ केली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत सर्वाधिक वाढ सूर्यफूल बियाणे यासाठी करण्यात आली असून, त्यानंतर कापूस, नायजर बियाणे आणि तीळ यांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्यात आली आहे. धान पिकाला 2441 आणि ग्रेड ए धान पिकाला 2461 रुपये प्रतिक्विंटल इतकी किमान आधारभूत किंमत देण्यात आली आहे. हायब्रीड ज्वारीला चार हजार तेवीस रुपये, बाजरा पिकाला 2900, तर  मक्का पिकाला  2410 इतकी प्रतिक्विंटल एम एस पी ठरवण्यात आली आहे. तूर डाळ - आठ हजार चारशे पन्नास रुपये आणि मुंग- 8780 रुपये प्रतिक्विंटल तर  मध्यम धाग्याच्या कापसाला 8267 आणि लांब धाग्याच्या कापसाला ८६६७ रुपये प्रतिक्विंटल इतकी किमान आधारभूत किंमत ठरवण्यात आली आहे.

---------------------------------------

बोधचिन्ह

'नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्या'च्या बोधचिन्हाचं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आलं. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अधिकृत बोधचिन्हामध्ये भारतीय अध्यात्म, श्रद्धा आणि सिंहस्थ परंपरेचे दर्शन घडते. भगवान शंकराचे त्रिशूळ, पवित्र श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर मंदिराची छटा; शिवलिंगाच्या स्वरुपात साकारलेली गोदावरी नदी यांचा या बोधचिन्हामध्ये वापर करण्यात आला आहे. सांस्कृतिक वारसा, भारतीय परंपरा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे देणारे हे बोधचिन्ह असल्याच मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितल.

---------------------------------------

शपथविधी सोहळा

राज्य विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी सोहळा उद्या होणार आहे. सभापती राम शिंदे या सदस्यांना सदस्यत्वाची शपथ देतील. द्विवार्षिक

निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेले डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, अंबादास दानवे, प्रमोद जठार, झीशान सिद्दीकी, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे, संजय भेंडे आणि पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या डॉ. प्रज्ञा सातव यांचा नवनिर्वाचित आमदारांमध्ये समावेश आहे.

---------------------------------------

सीबीएसई निकाल

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं आज बारावीच्या परीक्षेचे निकाल जाहीर केले. त्यात ८५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी पास झाले असले तरी गेल्यावर्षीच्या तुलनेत निकालात घट झाली आहे. मुलींचे पास होण्याचे प्रमाण ८८ टक्के तर मुलांमध्ये हे प्रमाण ८२ टक्के आहे.

---------------------------------------

देशव्यापी संप

बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या विरोधात औषध विक्रेत्यांनी येत्या २० मे रोजी देशव्यापी संप पुकारला आहे. राज्य रसायनशास्त्रज्ञ आणि औषध विक्रेते संघटनेचे उपाध्यक्ष मुकुंद दुबे यांनी आज भंडारा इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशात बनावट औषधांचा धोका वाढला आहे, ही बाब केंद्र सरकारच्या वारंवार निदर्शनास आणूनही त्याकडे लक्ष दिलं जात नसल्यानं, हा संप पुकारला असल्याचं त्यांनी सांगितलं. अनेक कंपन्या निकृष्ट दर्जाची औषधं तयार करून बाजारात आणत असून, या प्रकारात काही डॉक्टर्सचाही सहभाग असल्याचा आरोप दुबे यांनी केला.

---------------------------------------

आयात शुल्क

केंद्र सरकारने सोने आणि इतर मौल्यवान धातूंवरच्या आयात शुल्कात वाढ केली असून, ही वाढ आजपासून लागू झाली. अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली. सोने आणि चांदी या धातूंवर ५ टक्के शुल्क आकारलं जाईल, तर प्लॅटिनमच्या काही घटकांसाठी ५ पूर्णांक ४ दशांश टक्के शुल्क लागू होईल. परकीय चलन वाचवण्यासाठी इतर उपाययोजनांबरोबरच सामाजिक कल्याण अधिभार तसंच पायाभूत सुविधा आणि कृषी अधिभार वाढवल्याचं अर्थमंत्रालयाने जाहीर केलेल्या या निवेदनात म्हटलं आहे.

---------------------------------------

वाहन ताफा

पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीमुळे निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधनाचा वापर नियंत्रित करण्याचं आवाहन केलं होतं, त्या आवाहनानुसार मोदी यांनी आपल्या देशांतर्गत दौऱ्यांसाठीच्या ताफ्यात कपात केली आहे. विशेष सुरक्षा दलाच्या कार्यपद्धती नुसार ताफ्यातली अत्यावश्यक सुरक्षा अबाधित ठेवण्यात आली असून सुरक्षा दलातली अवांतर वाहनं कमी करण्यात आली आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी देखील त्यांचा सुरक्षा यंत्रणेचा ताफा निम्म्याहुन अधिक कमी केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज एक बैठक घेणार आहेत. या बैठकीत मंत्र्यांच्या ताफ्यातल्या वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याबाबत चर्चा होईल. दरम्यान कलेक्टर किंवा प्रशासनाला बैठकींसाठी प्रत्यक्ष न बोलावता ऑनलाइन संवाद करण्यास सुरुवात केली असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात सांगितलं.

---------------------------------------

स्व गणना

भारत सरकारच्या जनगणना विभागामार्फत दिनांक 1 मे पासून स्व गणना सुरू झालेली आहे. याबाबत अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांना स्व गणना पूर्ण करण्याचं आवाहन केलं होतं. सदर आवाहनाला जिल्ह्यातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत भातकुली तालुक्यातील बोरखडी खुर्द आणि इस्माइलपुर या गावातील सर्व कुटुंबांनी स्व गणना पूर्ण केली.अशा प्रकारे 100% स्व गणना पूर्ण करणारी ही अमरावती जिल्ह्यातील प्रथम गावे आहेत. या गावांचा आदर्श घेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त कुटुंबांनी 15 मे पर्यंत स्व गणना पूर्ण करण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

---------------------------------------

सांगली अपघात

सांगली जिल्ह्यात जत तालुक्यातील मोटेवाडी आसंगी तुर्क इथल्या मरगुबाई यात्रेदरम्यान काल सहा भाविकांचा मृत्यू झाला. अचानक आलेल्या पावसामुळे हे भाविक भिंतीच्या आडोशाला बसले असता भिंत कोसळून हा अपघात झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

---------------------------------------

कैलास मानसरोवर

कैलास मानसरोवर यात्रेला जाणाऱ्या यात्रेकरुंनी येत्या १९ मे पर्यंत अर्ज करावेत असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. यात्रेसाठीची नोंदणी लवकरात लवकर करण्याचं आवाहन मंत्रालयानं केलं आहे. kmy.gov.in या संकेतस्थळावरुन नोंदणी करता येऊ शकते, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

---------------------------------------

हवामान

प्रादेशिक हवामान खात्याने आज अकोला, अमरावती आणि वर्धा इथं उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. रात्रीच्या तापमानात देखील वाढ होण्याची शक्यता असल्यानं नागरिकांनी काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. त्याचबरोबर उद्या आणि परवा देखील या तिन्ही जिल्ह्यात उष्णतेचा येलो अलर्ट दिलेला आहे. दरम्यान नागपुरात आज सायंकाळच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाला काही ठिकाणी सुरुवात झाली. पाऊस आल्यामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. हवामान विभागाने येत्या काही तासांत नागपूर भंडारा, गोंदिया आणि वर्धा इथं सोसाटाच्या वारासह हलक्या पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. वाशीम आणि यवतमाळ येथे देखील तुरळक ठिकाणी पाऊस पडू शकतो.

---------------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. रायपूर इथं संध्याकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

---------------------------------------

मंत्री प्रताप सरनाईक

खासगी प्रवासी बस वाहतूकदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक दूर करण्यासह, दीर्घकालीन उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारनं विशेष समिती स्थापन केली आहे. ही समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग ॲप्सना आळा घालणे, प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल.

---------------------------------------